# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
### संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना विनियमावली

**१) योजनेचे नांव -**

या विनियमांना "संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना" या नावाने संबोधले जाईल.

**२) योजनेची अंमलबजावणी -**

सदर विनियम शैक्षणिक सत्र २०१७-२०१८ पासून अंमलात आले आहे.

**३) व्याख्या -**

या विनियमात उपयोगात आणल्या जाणाऱ्या व्याख्या खालीलप्रमाणे असतील.

**अ) महाविद्यालय :**

महाविद्यालय म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय.

**ब) विद्यार्थी :**

विद्यार्थी म्हणजे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालय/संस्था/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय येथे नियमितरित्या पदवी पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेला विद्यार्थी / विद्यार्थीनी.

**४) योजनेची उद्दिष्टे -**

**अ)** विद्यापीठ परिक्षेत्रातील अतिदुर्गम, दुर्गम, आदीवासी बहुल, ग्रामिण, तालुकास्तरीय किंवा जिल्हास्तरीय विना अनुदानीत/अनुदानीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शुध्द पेयजल मिळावे.

**ब)** विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी शुध्द पेयजल योजना राबविणे.

**५) पात्रता -**

**अ)** सदर योजनेचा लाभ हा क्रमवारीनुसार जसे अतिदुर्गम, दुर्गम, आदिवासी बहुल, मागास, ग्रामिण, तालुका व जिल्हास्तरीय महाविद्यालयांना घेता येईल.

**ब)** सदर योजनेचा लाभ हा त्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग ह्यांच्या UGC Act १९५६ मधिल १२ बी नुसार कोणतीही केंद्रसरकारची अनुदान मिळत नसेल अशा महाविद्यालयांना घेता येईल.

**क)** सदर योजनेचा लाभ हा बिगर व्यावसायिक महाविद्यालयांना घेता येईल.

**६) योजनेची कार्यप्रणाली -**

**अ)** संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना ही बिगर व्यावसायिक व तसेच ज्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग ह्यांच्या UGC Act १९५६ मधिल १२ बी नुसार कोणतीही केंद्रसरकारची अनुदान मिळत नसेल अशा महाविद्यालयांना लागु राहील.

**ब)** प्रत्येक वर्षी साधारणतः पाच महाविद्यालये अतिदुर्गम, दुर्गम, आदिवासी-बहुल, ग्रामीण व शहरी या पसंतीक्रमानुसार योजनेस पात्र असतील.

**क)** एकदा महाविद्यालय लाभांकित झाल्यानंतर त्या महाविद्यालयास पुढील १० वर्षे लाभ घेता येणार नाही.

**ड)** महाविद्यालयांचा मागील LEC चा अनुपालन अहवाल हा समाधानकारक असला पाहिजे.

**इ)** ज्या महाविद्यालयामध्ये सदर योजन कार्यान्वयीत केली असेल अशा महाविद्यालयांना पुढील LEC सोबत योजना सुस्थितीत असल्याचा अहवाल देणे बंधनकारक असेल.

**फ)** पात्र महाविद्यालयाच्या निकषामध्ये बदल करण्याचा अधिकार हा मा.कुलगुरूंना राहील.

**७) महाविद्यालयांची निवड -**

**अ)** ज्या महाविद्यालयांना सदर योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्या महाविद्यालयांनी परिच्छेद ६) मधील निकषांचे तंतोतंत पालन करत असेल अशा महाविद्यालयांनी सदर योजनेकरीता अर्ज संचालक, विद्यार्थी विकास ह्यांचेकडे ३१ ऑगस्ट पर्यंत सादर करावेत.

**ब)** संचालक, विद्यार्थी विकास ह्यांनी अर्जाची छाणणी करावी वा अथवा समिती गठत करुन छाणणी करुन घ्यावी.

**क)** निवड यादीचे प्रकाशन सप्टेंबर पर्यंत संचालक, विद्यार्थी विकास ह्यांनी करावे व तसेच पात्र महाविद्यालयास कळवावे व तसेच पात्र महाविद्यालयांची यादी ही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करावी.

**८) यंत्र सामुग्री खरेदी -**

**अ)** ज्या महाविद्यालयांची निवड करण्यात आली असेल अशा महाविद्यालयांना ३०% राशी विद्यापीठ खाती जमा करावी लागेल.

**ब)** महाविद्यालयाने ३०% राशी जमा केल्यानंतर विद्यापीठाने त्यामध्ये ७०% राशी वळती करावी.

**क)** विद्यापीठाच्या प्रचलित पध्दतीनूसार यंत्रसामुग्री खरेदी करण्यात येईल.

**ड)** सदर खरेदी केलेली उपकरणे ही विद्यापीठाच्या स्कंध पुस्तिकेत नोद करुन नंतर निवड झालेल्या महाविद्यालयास हस्तांतरीत करावे.

**९) उपरोक्त विनियमामध्ये किंवा निकषांमध्ये बदल करण्याचा अधिकार हा मा.कुलगुरूंचा असेल.**

संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ